# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक- २१२ दि.०९/०८/२०२१

**भाईंदर रेल्वे स्टेशन परिसरात चालणा-या वेश्याव्यवसायावर कारवाई करुन ०३ पिडित मुलींची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना भाईंदर रेल्वे स्टेशन समोर, बंदरवाडी नाका येथे एक महिला वेश्यादलाल नामे नेहा हि पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरविते अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस. एस. पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन दि.०७.०८.२०२१ रोजी १४.३० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल नामे मलेका उर्फ नेहा तफिझुर रेहमान शेख, वय-३१ वर्ष, रा. बांन्द्रा पुर्व, मुंबई मुळ रा. पं. बंगाल ही वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकाकडुन पैसे स्वीकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिला वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०३ मुलींची सुटका केली. सदर बाबत महिला वेश्यादलाल मलेका उर्फ नेहा तफिझुर रेहमान शेख, वय-३१ वर्ष, हिचेविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय विनायक ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. I ५४३/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पोहवा.१९८७ विजय ढेमरे, पोहवा.१६३ रामचंद्र पाटील, म.पो.ना. १७८९ यम्बर, म.पो.ना. २८४५ कमल चव्हाण, पो.शि. ३६६० केशव शिंदे, चालक पोना. २६३८ गावडे यांनी केली आहे.

-----ooooo-----